## **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर गंगाखेड यांचे न्यायालयात**

नियमित दिवाणी दावा क्रमांक २२/२०२३

सुभाष संभाजी माने
विरूध्द
जिल्हाधिकारी परभणी व इतर

निशाणी क्रमांक १३ वरील आदेश
(पारित केल्याचा दिनांक १८ ऑक्टोबर, २०२५)

१. अर्जाचे अवलोकन करण्यात आले त्यावर वादीतर्फे सादर म्हणणे यांचे देखिल अवलोकन करण्यात आले. प्रस्तूतच्या अर्जाव्दारे प्रतिवादी क्र. ९ यांनी विना वादोत्तर आदेश बाजुला करून वादोत्तर अभिलेखावर घ ेण्याची विनंती केली. प्रतिवादीस सर्व कागदपत्र व माहिती काढण्यासाठी वेळ लागला. परिणामतः मुदतीत वादोत्तर दाखल करू न शकल्यामुळे विना वादोत्तर आदेश पारित करण्यात आलेले आहे. वादीच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला व योग्य तो आदेश पारित करण्याची विंनती केल.

२. प्रस्तुत चा दावा वादीने प्रतिवादी क९ ने प्रतिवादी क्रमांक ३ च्या हक्कात करून दिलेले दानपत्र वादीवर बंधनकारक नाही व शाश्वन मनाई हुकूमाकरिता हा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांस समन्स ची बजावणी झाल्यचा अहवाल नाही. मात्र दिनांक २१.०७.२०२३ रोजी तो वकीलांमार्फत प्रकरणांत उपस्थित झालेला आहे. मात्र त्यांनी विहित मुदतीत वादोत्त्र सादर न केल्यमुळे माझ्या पुर्वाधिकारी यांनी दिनांक २६.०७.२०२४ रोजी विनावादोत्तर प्रकरण पुढे चालविण्यासाठी आदेश पारित केला. वादींनी त्यांचे सरतपासणीची

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.18 16:45:07 +0530

शपथपत्र सादर केल्यानंतर दिनांक १८.१०.२०२५ रोजी प्रतिवादींनी हा अर्ज दाखल केला आहे.

नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करण्यासाठी उभय पक्षांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे अपेक्षित आहे. मात्र त्याच वेळेस प्रतिवादीने केलेला विलंब याकडे देखील डोळेझाक करता येणार नाही. दाव्याचे स्वरूप विचारात घेता व प्रतिवादीमुळे या प्रकरणांत झालेला विंलब या सर्व बाबीचा विचार करता मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१ अर्ज नि.क्र १३ मंजुर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादीने वादीस विलंब शुल्क म्हणून २०००/रूपये अदा करावे

३ पुढील तारखेपर्यत प्रतिवादींनी वादीस विंलब शुल्क अदा न केल्यास प्रकरण विना वादोत्त्र पुढे चालु राहिल.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.18 16:45:14 +0530

दिनांक १८.१०.२०२५

**(गजानन भा. यादव)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
ता.गंगाखेड जि. परभणी